## शिक्षण हक्क कायदा 2009 (RTE - Right To Education Act 2009)

- 6 ते 14 वयोगट बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009.
- 1 एप्रिल 2010 पासून हा कायदा लागू झाला.
- 2002 मध्ये 86 वी घटनादुरुस्ती झाली, त्यानुसार मूलभूत हक्कामध्ये 21A हे कलम समाविष्ट करण्यात आले. या घटनादुरुस्तीने 6-14 वयोगटासाठी प्राथमिक शिक्षण हे मूलभूत हक्कात समाविष्ट करण्यात आले, त्यानुसार या हक्काच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने 2009 मध्ये RTE act तयार केला.
- शालेय प्राथमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शालेय प्रवेश, उपस्थिती आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाकडे सोपवणारा हा जगातील अशा प्रकारचा पहिलाच अधिनियम आहे. इतर देशांमध्ये ही जबाबदारी पालकांवर सोपविण्यात येते.
- **अधिनियमातील प्रमुख तरतुदी** : शैक्षणिक वर्षाच्या कोणत्याही दिवसापासून शाळेत प्रवेश घेता येईल. मुलाचे 6 वर्षांपेक्षा जास्त वय आहे, मात्र त्याने अजून कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नाही अथवा मुलाने शाळेत प्रवेश घेतला होता, मात्र प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नाही (गळती झालेले) अशा मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश दिला जाईल. तसेच अशा मुलांना इतर नियमित विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बरोबरीने आणण्यासाठी संबंधित शिक्षक अतिरीक्त खास शिक्षण या विद्यार्थ्यांना देतील.
- **अनिवार्य शिक्षण** : राज्य सरकारवर 6-14 वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचे, अनिवार्य प्रवेश, उपस्थिती व शिक्षणाची पूर्तता करण्याचे बंधन आहे. 6 ते 14 वयोगट विद्यार्थ्यांना परिसरातील जवळच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क.
- मोफत शिक्षण म्हणजे कोणत्याही प्रकारची फी, शुल्क इतर खर्च करण्याची विद्यार्थ्यांना गरज नाही.

- एकाच ठिकाणी प्राथमिक शिक्षण उपलब्ध नसेल तर विद्यार्थ्यांना शाळा बदलण्याचा अधिकार आहे. स्थलांतर, उच्च प्राथमिक शाळांची अनुपलब्धी या कारणांनी विद्यार्थी शाळा बदलतात. रहिवासी दाखला नसेल तरीही शाळेत प्रवेश दिला जाईल.
- प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला कोणत्याही कारणासाठी परीक्षा पास होण्याचे विद्यार्थ्यांवर बंधन नाही. तसेच त्याला कोणत्याही वर्षी नापास केले जाणार नाही.
- प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर (8 वी नंतर) प्रत्येक विद्यार्थ्याला 'प्रमाणपत्र' देण्यात येईल.
- प्राथमिक शिक्षणात लैंगिक, सामाजिक, आर्थिक भेदभाव विद्यार्थ्यांमध्ये केला जाणार नाही. पूर्वप्राथमिक शिक्षण (3 ते 6 वयोगट) हे राज्यशासनाचे कर्तव्य समजण्यात आले नाही मात्र त्याबाबत राज्यशासनाने काही व्यवस्था करावी.
- RTE (2009) Act अंतर्गत खालील बाबी प्रतिबंधित.
  - ➢ शारीरिक शिक्षा व मानसिक छळ
  - ➢ प्रवेशासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा
  - ➢ पालक व मुलांच्या मुलाखती
  - ➢ Donation फी, शुल्क
  - ➢ शिक्षकांमार्फत खासगी शिकवणी
  - ➢ विनामान्यता शाळा चालवणे (1 लाख रुपये दंड)
- जनगणना, निवडणुका, आपत्ती निवारण या कामांशिवाय इतर गैर-शैक्षणिक कामांसाठी शिक्षकाच्या नेमणुकीवर प्रतिबंध करण्यात आला आहे.
- शिक्षकांच्या नेमणुकीबाबत योग्य शैक्षणिक अर्हता व सेवाशर्ती पाळण्याचे बंधन तसेच प्राथमिक स्तरावर शिक्षक-विद्यार्थी प्रमाण 1 : 30 असावे.
- आपल्या मुलाला शाळेत पाठवणे हे प्रत्येक पाल्याचे कर्तव्य आहे. सरकार, स्थानिक प्राधिकारी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निश्चित करण्यात आली आहेत. केंद्र-राज्य यांच्यात वित्तीय व इतर जबाबदारी यांची विभागणी करण्यात आली आहे.
- शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करणे; तिची रचना, कार्य, सदस्य याबाबत माहिती दिली आहे.
- परिसर शाळा
  - ➢ मुलांना निम्न प्राथमिक शाळा (1 ते 5) 1 किमी. अंतराच्या आत.
  - ➢ उच्च प्राथमिक शाळा (6 ते 8) 3 किमी. अंतराच्या आत उपलब्ध असाव्यात.
- शाळामध्ये पायाभूत सुविधा खोल्या, क्रीडांगणे, स्वच्छतागृह पुरवणे.
- सर्व खासगी शाळांमध्ये समाजातील वंचित गटांच्या मुलांना 25% जागा आरक्षित असतील.
  - ➢ वंचित गट : SC, ST राज्यशासन निर्देशित करेल असा कोणताही प्रवर्ग.
  - ➢ ज्या बालकांच्या पालकांचे उत्पन्न 1 लाख प्रतिवर्षापेक्षा कमी असे. NT, VJ, OBC, SBC अन्य धार्मिक अल्पसंख्याक.
- कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय शिक्षण आयोग व राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग स्थापण्याची तरतूद करण्यात आली आहे.
- राष्ट्रीय बालहक्क संरक्षण अधिनियम 2005 नुसार
  - ➢ राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग 2007 मध्ये स्थापन झाला होता. त्यामुळे RTE act 2009 मधील बालकांच्या हक्कांचे उल्लंघन झालेल्या तक्रारीची चौकशी करणे व त्याबाबत योग्य ती करवाई करण्याची जबाबदारी या आयोगाची आहे.
- RTE act 2009 च्या तरतुदी मदरसा व इतर धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थांना लागू नाहीत.
- राष्ट्रीय सल्लागार मंडळ व राज्य सल्लागार मंडळ स्थापण्याची तरतूद या कायद्यात होती.
- 11 नोव्हेंबर हा दिवस 2008 पासून मौलाना अबुल कलाम आझाद (भारताचे पहिले शिक्षणमंत्री) यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरा केला जातो.
- RTE act 2009 नुसार निर्धारित लक्षे

| | | |
|---|---|---|
| 1 | गुणवत्ता निर्धारण व इतर | 1 एप्रिल 2010 पासून तात्काळ सुरुवात |
| 2 | परिसर शाळा स्थापना | 3 वर्ष (31-3-2013 पर्यंत) |
| 3 | पायाभूत शालेय सुविधांची पूर्तता | 3 वर्ष (31-3-2013 पर्यंत) |
| 4 | शिक्षक : विद्यार्थी प्रमाण (1 : 30) | 3 वर्ष (31-3-2013 पर्यंत) |
| 5 | अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षण | 5 वर्ष (31-3-2015 पर्यंत) |

- शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षकांनी निर्धारित किमान पात्रता प्राप्त करण्याची अंतिम मुदत 31 मार्च 2015 होती. मात्र आता ही मुदत वाढवून 31 मार्च 2019 करण्यात आली आहे.
- RTE 2009 अंतर्गत शालेय पायाभूत सुविधांबाबतची मानके व प्रमाणके

- शिक्षक-विद्यार्थी प्रमाण
  - पहिली ते पाचवी या वर्गांसाठी प्रत्येक 30 विद्यार्थ्यांमागे 1 शिक्षक.
    150 पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर शाळेला स्वतंत्र मुख्याध्यापक
  - 6 वी ते 8 वी वर्गासाठी
    - 35 विद्यार्थ्यांसाठी 1 शिक्षक.
    - 100 पेक्षा अधिक विद्यार्थी स्वतंत्र मुख्याध्यापक.
    - प्रत्येक इयत्तेसाठी किमान 1 शिक्षक. गणित, विज्ञान, समाजशास्त्र, भाषा यासाठी स्वतंत्र शिक्षक.
- शैक्षणिक वर्षातील अध्यापनाचा कालावधी
  - 1 ते 5 वी
    - कामाचे दिवस : 200
    - अध्यापनाचे तास : 800
  - 6 ते 8 वी
    - कामाचे दिवस : 220
    - अध्यापनाचे तास : 1000
    - प्रत्येक शिक्षकाला प्रति आठवडा कामाचे 45 तास
- ग्रंथालय, खेळण्याचे साहित्य, शैक्षणिक साहित्य यांची व्यवस्था करण्यात येईल.
- स्वतंत्र पक्की इमारत, अपंगांसाठी (Ramp) अडथळाहीन प्रवेश, मुले-मुली स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, मध्यान्ह भोजन शिजवण्यासाठी स्वतंत्र स्वयंपाकघर, क्रीडांगण, शाळेला सुरक्षा भिंत अथवा कुंपण.

- RTE - 2009 या कायद्याला अनुसरून 'महाराष्ट्र शासनाने ऑक्टो 2011 मध्ये महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011' प्रसिद्ध केले.
- महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित गटातील बालकांना व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी राखीव जागा) नियम 2012.
- RTE 2009 नुसार अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सल्लागार परिषद स्थापण्याची तरतूद. या परिषदेचे अध्यक्ष राज्याचे शिक्षणमंत्री असतील. 14 सदस्यीय समितीमध्ये निम्म्या जागा महिलांसाठी राखीव असतील.
- 2010-11 या शैक्षणिक वर्षापासून कोणत्याही 1 ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्याला नापास न करण्याचा निर्णय घेतला. 1-8 वी पर्यंत विद्यार्थ्यांना गुण देण्याऐवजी श्रेणी देण्याची तरतूद करण्यात आली होती.
- मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मुलांचा हक्क (दुसरी सुधारणा) विधेयक, 2017. हे विधेयक 18 जुलै 2018 मध्ये लोकसभेत मंजूर करण्यात आले. त्यानुसार 5 वी आणि 8 वी च्या टप्प्यांवर विद्यार्थ्यांची परीक्षा होणार असून त्यांना नापासही केले जाऊ शकते.
- 5 वी व 8 वी च्या स्तरांवर विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाईल. यात अनुतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना 2 महिन्यांच्या आत परीक्षेची दुसरी संधी देण्यात येणार आहे. दुसऱ्यांदा घेण्यात आलेल्या परीक्षेतही विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना त्याच वर्गात पुन्हा बसवण्याची मुभा शाळांना मिळेल.
- नापास झालेल्या विद्यार्थ्यांना आहे त्याच वर्गात बसवावे की नाही, याबाबतचा निर्णय घेण्याची मुभा केंद्र/राज्य शासनांना देण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांना 8 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

## शिष्यवृत्ती परीक्षा

- पूर्वी या परीक्षा 4 थी व 7 वी या वर्गांसाठी घेतल्या जात होत्या. मात्र आता शिष्यवृत्ती परीक्षा 5 वी व 8 वी या स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जातात.
- 5 वी ला शिष्यवृत्ती परीक्षेत मेरीटमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्याला 5 वी ते 8 वी पर्यंत दरमहा शिष्यवृत्ती मिळते.
- 8 वी ला शिष्यवृत्ती परीक्षेत मेरीटमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्याला 9 वी व 10 वी साठी दरमहा शिष्यवृत्ती मिळते.